॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


✲ सुविचार ✲

श्रद्धेच्या जोरावर
असाध्य गोष्टीही साध्य करता येतात







■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक १२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### राज-उद्धव ठाकरेंच्या युतीला 'मनसे'तून विरोध

● **मुंबई** – मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एका मुलाखतीमध्ये उद्धव ठाकरेंसोबत युती करण्यास तयार असल्याचे म्हटले. तसा प्रस्ताव त्यांनी मुलाखतीमध्ये दिला. यावर उद्धव ठाकरेंनी देखील महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येणार असल्याचे सांगितले. त्यामुळे राज-उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी मनसे-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची युती होईल, असे बोलले जात आहे. राज-उद्धव ठाकरे यांची युती होणार असल्याची चर्चा सुरू असतानाच मनसेतील नेत्यांनी मात्र या युतीला विरोध असल्याचे संकेत दिले आहेत. मुंबईचे शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांनी युती म्हणजे फक्त निवडणुकीपुरती असे नाही. मराठीच्या मुद्यावर तो मराठी पक्ष एकत्र आले तर काय हरकत आहे, असे म्हटले. मात्र, उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना १७ हजार मनसेसैनिकांवर गुन्हे दाखल केले होते त्यासाठी माफी मागणार का? असा सवाल केला. मनसेच्या चित्रपट सेनेचे प्रमुख अमेय खोपकर यांनी तर ट्विट करत 'अशी अभद्र युती होऊ नयेत हीच ईश्वर चरणी प्रार्थना', असे म्हणत अप्रत्यक्ष मनसे-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासोबतच्या युतीला विरोधच केला आहे.

### अजित पवार यांचे हेलिकॉप्टर बिघडले; राष्ट्रवादीचा मेळावा रद्द

● **नाशिक** – उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये (दि. २०) मेळावा होणार होता. मात्र, हेलिकॉप्टरमध्ये बिघाड झाल्यामुळे पवारांचा दौरा रद्द झाला. त्यामुळे अजित पवार गटाचा मेळावाही रद्द करण्यात आला. विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवार गटाने जिल्ह्यात कार्यकर्त्यांसाठी एकही कार्यक्रम घेतला नव्हता. त्यातच माजी मंत्री विद्यमान छगन भुजबळ यांना मंत्रिपद देण्यात न आल्याने पक्षांतर्गत नाराजीनाट्य रंगले होते. त्यामुळे या मेळाव्याकडे कार्यकर्त्यांसह राजकीय क्षेत्राचे लक्ष लागले होते. भुजबळ आणि अजित पवार एकाच व्यासपीठावरून काय बोलतात, याकडे लक्ष लागले होते. त्यासाठी नाशिकमधील रस्त्यांवर मोठमोठे बॅनरही लावण्यात आले होते. नाशिक जिल्ह्यात अजित पवार गटाच्या आमदारांची संख्याही जास्त आहे. त्यामुळे मंत्रिपदासह महामंडळाचे मोठे पदही या पक्षाकडे आहे. यासाठी मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली होती. परंतु, अजित पवारांच्या हेलिकॉप्टरमध्ये झालेला बिघाड प्रयत्न करूनही ते सुरू न झाल्याने अजित पवारांनी दौरा रद्द केला.

# जम्मू-काश्मिरात ढगफुटी

## तिघांचा मृत्यू, जनजीवन विस्कळीत । शेकडो लोकांचे स्थलांतर

● **श्रीनगर । वीरभूमी–**

जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे हाहाकार उडाला असून, पावसाची संततधार आणि ढगफुटीच्या घटनेने भीषण स्थिती निर्माण झाली. पुरामुळे २ चिमुकल्यांसह तिघांचा मृत्यू झाला. भारतीय लष्कर आणि प्रशासकीय पथकांनी बचाव कार्य सुरू केले असून १०० हून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे.

जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भूस्खलनामुळे वाहतुकीलाही मोठा फटका बसला. रामबनचे एसएसपी कुलबीर सिंह यांनी महामार्ग पाच ठिकाणी बंद करण्यात आले आहेत. हवामानाची स्थिती पूर्वपदावर येताच वाहतूक सुरळीत होणार आहे, असे म्हटले. राज्यातील रामबनमधील सारी बागना गावात ढगफुटीची दुर्घटना घडली. यामध्ये आकिब अहमद आणि मोहम्मद साकिब या दोन चिमुकल्यांसह तीन जणांचा मृत्यू झाला. यासोबतच धरम कुंडमध्येही पुरस्थिती ओढवली, ज्यामध्ये ४० घरांचे नुकसान झाले. यातील १० घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत तर उर्वरित घराचे अंशत: नुकसान झाले आहे.

रामबन जिल्ह्यात ढगफुटीमुळे परिस्थिती बिकट झाली आहे. दोन हॉटेल्स, काही दुकाने आणि घरांचे मोठे नुकसान झाले. तसेच अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आले आहेत. आतापर्यंत ५०० पेक्षा जास्त लोकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. श्रीनगरला विमान वाहतूकही विस्कळीत झाली. ढगफुटीमुळे अनेक इमारतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेकडो वाहनेही राडा-रोड्यात बुडाली.

दरम्यान, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडून रामबनमधील या प्रलयाबद्दल दु:ख व्यक्त करण्यात आले आहे. त्यांनी अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी मदत आणि दुरुस्ती योजनांचा आढावा घेतला जाईल.



या घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनीही तीव्र दु:ख व्यक्त केले. जिल्हा प्रशासन, एसडीआरएफ आणि इतर बचाव पथके वेगाने मदतकार्य करण्यासाठी गुंतली आहेत. सर्व बाधित कुटुंबांना शक्य तितकी मदत केली जात आहे, असेही सिन्हांनी नमूद केले.

## १० हजार महिलांना ई-रिक्षा वाटप



● **मुंबई । वीरभूमी–**

महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महत्वाकांक्षी 'पिंक ई-रिक्षा' योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील पात्र महिलांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी (दि. २०) १० हजार पिंक ई-रिक्षा वितरीत करण्यात आल्या. महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत महिलांना सवलतीच्या दरात पिंक रिक्षा उपलब्ध करून देण्याच्या सरकारच्या योजनेची नागपूरात सुरुवात झाली आहे.

नागपूर शिवाय पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, अमरावती या आठ जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने पिंक रिक्षा गरजू महिलांना उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. पिंक रिक्षाच्या एकूण किमती पैकी २०% अनुदान राज्य सरकार देणार असून दहा टक्के रक्कम लाभार्थी महिलांना द्यावी लागणार आहे. तर उर्वरित ७० टक्के रक्कम सवलतीच्या व्याजदरावर कर्ज म्हणून उपलब्ध करून दिली जात आहे.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील १० हजार महिलांना रोजगार देण्याचा उद्दिष्ट तर या योजनेमागे आहे. सोबतच शहरात महिलांना सुरक्षित सार्वजनिक वाहतुकीचे साधन मिळावे, रात्री अप-रात्री महिला या पिंक इ-रिक्षाच्या माध्यमातून सुरक्षित फिरू शकतील. तसेच पिंक इ-रिक्षा योजनेच्या पहिल्या टप्प्याचा वितरण नागपुरातून करत आहे, याचा मला आनंद आहे, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

## पाथर्डीत शिक्षकास ३० हजारांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले

● **पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक व पोलिसांनी पाथर्डी शहरातील एका पान टपरी चालकाच्या घरी दि. ४ एप्रिल २०२५ रोजी छापा टाकून घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये असलेली सुगंधी सुपारी व मावा तयार करण्याचे साहित्य जप्त केले. या प्रकरणी मोठ्या कलमान्वये गुन्हा दाखल होवून अटक होवू नये म्हणुन व तपासकामी मदत व्हावी म्हणुन खाजगी इसमाने तब्बल दोन लाख रुपयाची लाच मागितली. यातील दीड लाख रुपये ऑनलाऊन पद्धतीने पाठविल्यानंतर राहीलेले पैसे द्यावेत म्हणुन खाजगी इसमाने तगादा लावला. यातील ३० हजार रुपये लाच स्वीकारतांना खाजगी इसम प्राथमिक शिक्षक विजय गर्जे (रा. पाथर्डी) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रविवारी पाथर्डीत रंगेहाथ पकडले.

याबाबत समजलेली माहिती अशी की, कोरडगाव येथील एका इसमाच्या पान टपरीवर पाथर्डीचे सपोनि. व पोलिस पथकाने छापा टाकून तक्रारदार यांच्या घराजवळील पत्र्याच्या शेडमधून सुगंधी तंबाखू सुपारी व मावा तयार करण्याचे मशीन असा माल जप्त केला होता. कारवाई सुरू असताना ओळखीच्या माणसाने खासगी व्यक्तीच्या सह्याने पोलिसांनी मदत करावी म्हणून मागणी केली. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षक असणारा विजय गर्जे याने तुझ्या भावावर मोठ्या कलमाने गुन्हा दाखल करू नये व अटकपूर्वक जामीनसाठी पोलिसांनी मदत करावी, यासाठी दोन लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. गर्जे यांच्या ओळखीच्या कोरडगाव येथील एका व्यक्तीच्या नावावर ऑनलाईन दीड लाख रुपये घेतले गेले. राहिलेल्या ५० हजार रुपयापैकी ३० हजार रुपये सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना देण्यासाठी द्यावे लागतील, असे विजय गर्जे यांनी सांगितले. विजय गर्जे याने रविवारी पाथर्डी शहरात उसाच्या रसाच्या गाड्यावर ३० हजार रुपयांची लाच स्वीकारताना अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी गर्जे याला रंगेहात पकडले.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपाधीक्षक अजित त्रिपुटे, पोलीस अंमलदार संतोष शिंदे, रवींद्र निमसे, बाबासाहेब कराड, चंद्रकांत काळे, विजय गंगुल, दशरथ लाड यांच्या पथकाने केली.

घटनेची माहिती कळताच पाथर्डी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मोबाईल बंद करून पसार झाले आहेत. या प्रकरणात एक लाख ८० हजार रुपये लाच स्वीकारली असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

## राज्यभरातील 1 लाखांहून अधिक शाळांची होणार तपासणी

● **मुंबई । वीरभूमी –**

राज्यातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या जिल्हा परिषद व नागरी भागातील शाळांमध्ये नेमक्या कोणत्या सुविधा आहेत आणि काय कमी आहे, याचा सखोल आरसा आता उघड होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने घेतलेल्या सुमोटो याचिकेच्या अनुषंगाने शिक्षण विभागाला मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश दिल्यानंतर शिक्षण खात्याच्या यंत्रणेला खडबडून जाग आली आहे.

या आदेशाची अंमलबजावणी करताना शासनाने राज्यस्तरीय समिती गठीत केली असून, समितीच्या ९ एप्रिल रोजी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील तब्बल १,०८,१७३ शाळांची तपासणी होणार आहे. ही तपासणी ११ एप्रिल ते १५ मे या कालावधीत केली जाणार आहे. या मोहिमेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्याने आपापल्या भागातील स्थितीवर आधारित अहवाल पुणे येथील शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांच्याकडे पाठवायचा आहे.



ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांसाठी केंद्रप्रमुख, तर शहरांतील शाळांसाठी पर्यवेक्षक, विस्तार अधिकारी, सहायक प्रशासकीय अधिकारी, मनपा आणि नगरपालिका प्रशासकीय अधिकारी, तसेच गटशिक्षणाधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

या अधिका-यांनी तपासलेल्या किमान दोन शाळांचा पुन्हा एकदा जिल्हास्तरीय समितीमार्फत स्वतंत्र तपासणी केली जाणार आहे. यामध्ये आधीच्या अहवालांची वस्तुनिष्ठ छाननी होणार असून, प्रत्येक शाळेची सद्यस्थिती प्रत्यक्ष पाहणीतून तपासली जाणार आहे.

हा सर्व अहवाल केवळ कागदोपत्री न राहता खऱ्या अंमलबजावणीकडे वाटचाल करेल का, हा खरा प्रश्न आहे. मात्र, न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे आणि समितीच्या कठोर भूमिकेमुळे यंदाची तपासणी केवळ औपचारिकतेपुरती मर्यादित राहणार नाही, अशी पालक व शिक्षकवर्गाची अपेक्षा आहे.

## रणजीत कासलेंचे आरोप खोटे

● **मुंबई । वीरभूमी–**

निवडणूक आयोगाने बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले यांचे परळी निवडणुकीसंदर्भातील आरोप फेटाळले आहेत. कासले यांनी ईव्हीएम मशीनमध्ये छेडछाड करण्यासाठी दहा लाख रुपये मिळाल्याचा खोटा दावा केला होता. आयोगाने स्पष्ट केले की, कासले यांची निवडणुकीत कोणतीही ड्युटी नव्हती.

दरम्यान, सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले याचे परळी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने व्हिडिओद्वारे प्रसारित केलेले आरोप खोटारडे, जनतेची दिशाभूल करणारे तसेच निवडणूक आयोगावर शंका उपस्थित करणारे असून त्यात कोणतेही तथ्य नाही. रणजीत कासले यांना संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत स्ट्राँग रूमच्या सुरक्षित, ईव्हीएम मशीन सुरक्षा किंवा मतमोजणी प्रक्रिया यापैकी कुठेही परळी मतदारसंघात ड्युटी देण्यात आलेली नव्हती. ते बीड सायबर विभागात नियुक्त होते, असा स्पष्ट खुलासा राज्य निवडणूक आयोगाने अधिकृतरित्या केला आहे.

निवडणूक प्रक्रियेत स्ट्राँग रूममध्ये ईव्हीएम मशीन ठेवलेल्या ठिकाणी आपली ड्युटी होती व तिथे ईव्हीएम मशीनसोबत छेडछाड करता यावी, यासाठी आपल्याला दहा लाख रुपये देण्यात आल्याचा खोटा आरोप रणजीत कासले याने सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करून केला होता. त्याची गंभीर दखल घेत निवडणूक आयोगाने बीड जिल्हा प्रशासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

# SPOT NEWS

## शिक्षक भारती नगर जिल्हा संघटकपदी चंद्रशेखर हासे यांची निवड



**● अकोले । वीरभूमी–**
साने गुरुजी स्मारक पुणे येथे शिक्षक भारती राज्य कार्यकारणी बैठकीत सह्याद्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ब्राह्मणवाडा (ता. अकोले) येथील इंग्रजी विषयाचे प्रा. चंद्रशेखर हासे यांची अहिल्यानगर जिल्हा संघटकपदी निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, प्रमुख कार्यवाह संजय वेतुरेकर यांच्या सहीचे नियुक्तीपत्र हासे यांना देण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आला. शिक्षक भारती संघटना ही धर्मनिरपेक्ष, लोकशाही, समतावादी आणि विज्ञाननिष्ठ समाज निर्मितीसाठी कार्य करणारी संघटना आहे यावेळी ज्युनिअर कॉलेज युनिट महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष जी. टी. पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र झाडे, धनाजी पाटील, पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, सुनील गाडगे विनाअनुदान विरोधी कृती समितीचे महिला अध्यक्ष रूपालीताई कुरुमकर, जिल्हाध्यक्ष रामराव काळे, आप्पासाहेब जगताप दादासाहेब जगताप, राजीव शिरसठ, विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष पदाधिकारी यांनी संघटनेच्या वतीने यावेळी अभिनंदन केले.

# संत श्री शेख महंमद यांचे खरे वंशज आम्हीच : अय्याज शेख

### ग्रामस्थांना अंधारात ठेवत मंदिराची नोंदणी वक्फ बोर्डाकडे । मंदिर जीर्णोद्धारासाठी गावकऱ्यांचे कीर्तन-भजन करत धरणे आंदोलन

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
संत शेख महमंद महाराज यांचे आम्ही खरे वंशज असून आमीन शेख हे आमच्याबद्दल चुकीच्या माहिती प्रसारित करून मूळ वंशजाबाबत संभ्रम निर्माण करत आहेत. यास्थितीत नेत्यांपेक्षा महाराजांचे भक्तगण व गावकऱ्यांनी ठाम निर्णय घेण्याची वेळ आली आहे. मी खरा वंशज आहे पण अमिन खरा वंशज नाही. त्यांना आमच्या पूर्वजांनी मदतीला आणले आहे. मात्र ते आता वंशज असल्याचे सांगत आहेत.आम्ही न्यायालयीन लढाई लढत आहोत आम्हाला गावाने मदत करावी असे अय्याज शेख यांनी श्रीगोंदा येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी बोलताना घनश्याम शेलार म्हणाले की दर्गा ट्रस्ट रद्द व्हावे, वक्फ बोर्ड रद्द केल्यानंतरच मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा. संत श्री शेख महंमद महाराज यांचा इतिहास बदलण्याचा प्रयत्न सुरू आहे. भागवत धर्माची पताका घेउन चाललेले संत त्यांनी योगसंग्राम, पवन विजय, अभंग गाथा हे ग्रंथ लिहले. मात्र महाराजांचा आज इतिहास बदलण्याचा प्रयत्न तथाकथित वंशज करत आहेत ते आम्ही होऊ देणार नाही.

पुढे बोलताना श्री. शेलार म्हणाले की, २००८ साली विवाद झाला. तो का झाला तर संत शेख महंमद यांच्या विषयी चुकीचे पुस्तक छापून ते वाटण्यात आले होते. त्यामुळे ती चर्चा बंद खोलीत झाली नाही. आमच्या विषयी काही अडचण असेल तर सांगा पण चुकीच्या व्यक्तींना समर्थन करू नका. शेख महमंद महाराज देवस्थान मठ नोंदणी १९५३ साली होऊन देवस्थान मठ बनले. पण नंतर त्याचा अंधारात ठेवून दर्गा ट्रस्ट केला. आता जीर्णोद्धार करण्यास विरोध नाही असे आमीन शेख सांगत असले तरी त्यांनी देवस्थान मठाचा दर्गा करून तो वक्फकडे नोंदणी केला. पण या चुकीच्या गोष्टीला संत, वारकरी, गावकरी यांना मान्य नाही. दर्गा ट्रस्ट रद्द व्हावे. देवस्थान मान्य असेल तरच चर्चेला यावे. मालोजी राजे यांनी दिलेली मालमत्ता वफत बोर्डाकडे दिली. हा हेतू शुध्द नाही असे शेलार यांनी सांगितले.

ॲड. श्रीनिवास पत्की यांनी सांगितले, अमिन शेख यांनी वक्फ नोंदणी लपून ठेवली. नंतर एक दाव्यात ही केस वक्फकडे वर्ग करावे असे त्यांचे म्हणणं होतं. वक्फकडे नोंदणी झाल्याचे २०२०-२१ साली आम्हाला कळाले. जेष्ठ नेते बाबासाहेब भोस यांनी म्हणाले की आम्ही आ. विक्रम पाचपुते, माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्याबरोबर बोललो असून आम्ही सगळे एकत्र बैठक घेणार आहोत. लवकरच आंदोलन तीव्र करणार असे सांगितले. यावेळी यात्रा कमिटी अध्यक्ष गोपाळ मोटे यांनी यात्रा उत्सवाचे काम पारदर्शक आहे. आम्ही सगळ्या खर्चाचे ऑडीट करतो. सगळा हिशोब ठेवतो. मंदिर व्हावे हीच अपेक्षा आहे.

पत्रकार परिषदेला ॲड. श्रीनिवास पत्की, गोपाळ मोटे, सुदाम झुंजरूक, पोपटराव खेतमाळीस, अय्याज शेख, बापूराव गोरे, सतीश मखरे, नंदकुमार ताडे, भोजराज मोटे आदींसह गावकरी उपस्थित होते.



### सलग चौथ्या दिवशी भजन - कीर्तनात धरणे आंदोलन सुरू

■ धरणे आंदोलनाचा चौथा दिवस सुरू असून जोपर्यंत निर्णय लागत नाही तोपर्यंत भक्तिभावात आंदोलन सुरू ठेवण्याचा ठाम निर्धार गावकऱ्यांनी केला आहे. मात्र देवस्थान जमीन वक्फ बोर्डाकडे हस्तांतरित झाल्याचे कळाल्यावर श्रीगोंदेकरांकडून संताप व्यक्त होत आहे. तोडगा निघणार की नाही याबाबत संमिश्र साशंकता दिसून येत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर माता रमाई समाजभूषण पुरस्काराने राहुल डंबाळे व उत्कर्षाताई रुपवते सन्मानित

**● अकोले । वीरभूमी–**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त प्रत्येक वर्षी दिला जाणारा मानाचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारक समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांना तर त्यागमूर्ती माता रमाई समाजभूषण पुरस्काराने वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षाताई रुपवते यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव एकता समितीचे अध्यक्ष सुभाष त्रिभुवन तसेच माजी शिक्षण उपसंचालक रामचंद्र जाधव तसेच प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ फेटा बांधून तसेच सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.



श्रीरामपूर येथे रेल्वे स्टेशन जवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव एकता समिती तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा स्मारक समिती च्या संयुक्त विद्यमाने १३४ वा जयंती सोहळा सम्पन्न झाला.

यावेळी समाजामध्ये उल्लेखनीय काम करणारे भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारक समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे तसेच वंचित बहुजन आघाडी राज्य प्रवक्त्या उत्कर्षाताई रुपवते यांना या कार्यक्रमात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी चरण त्रिभुवन, सुमेध पडवळ, संघराज त्रिभुवन, बाळासाहेब बागुल, हनीफ पठाण, सुनील मगर, अंबादास निकाळजे, बाबासाहेब पवार, अर्जुन शेजवळ, शिवा साठे, पी. एस. निकम, रवींद्र गायकवाड, किशोर ठोकळ, रॉकी लोंढे, रज्जाक पठाण, एजाज पठाण, राकेश थोरात,भारत त्रिभुवन, वसंत साळवे, सतीश त्रिभुवन, मिलिंद धीवर, सुरेश शेळके, अशोक दिवे, संतोष त्रिभुवन तसेच महिला आघाडीच्या सुशीलाताई त्रिभुवन, ॲड. सोनाली त्रिभुवन, कांताबाई जाधव, आशाबाई रुद्राक्ष, बुद्धप्रिया त्रिभुवन, संगीताताई गायकवाड, प्राजक्ता त्रिभुवन उपस्थित होते.

यावेळी मुंबई येथील शाहीर नितीन बनसोडे, नरेश बडेकर, पल्लवी खरात, पूनम कदम यांनी आपल्या सुरेल आवाजात भीमगीते सादर करून भीम अनुयायांची मने जिंकली.

# रांजणी झेडपी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**● पाथर्डी । वीरभूमी–**
ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधुनही दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम राबविले जात आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी हे इतर शहरी व खाजगी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांपेक्षा कमी नाही. त्याचा ही आत्मविश्वास प्रचंड आहे. फक्त त्यांच्या कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन केंद्रप्रमुख उद्धव बडे यांनी केले.



तालुक्यातील रांजणी जिल्हा परिषद शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी अध्यक्षस्थानावरून हंडाळवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख उद्धव बडे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून उपसरपंच ज्ञानदेव मुंढे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष रावसाहेब भताने उपस्थित होते. यावेळी शिक्षक बँकेचे संचालक ज्ञानेश्वर शिरसाट, माजी संचालक अर्जून शिरसाट, सुरेश खेडकर, रमेश वाघ, पांडुरंग घुमरे, रा. का. बडे, अतुल आंधळे, संतोष पालवे, अनिल बडे, भारत पालवे, बंडू खेडकर, फुंदे मॅडम, शिरसाटवाडी सरपंच भावना पालवे, सदस्य अविनाश पालवे, रवि शिरसाट, अनिल शिरसाट यांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली. या बहारदार कार्यक्रमात ग्रामीण विद्यार्थांच्या सुप्त कलागुणाना वाव देणारे विविध कार्यक्रम पार पडले. यामध्ये स्वागत गीत, देशभक्तीपर गीते, शेतकरी गीते व नृत्य, कोळी नृत्य, सामाजिक सलोख्यावर विविध गीत, नाटीका, साक्षरता नाटीका, समाज प्रबोधन व जनजागृती नाट्य असे विविध सास्कृतिक उपक्रम सादर करण्यात आले. या बाल चिमुकल्यांच्या नृत्य अदाकारीने, नाट्य अभिनयाने, गायन, सादरीकरणाने उपस्थितीतांना मंत्रमुग्ध केले. यावेळी महीला पालकाची उपस्थिती प्रेक्षणीय होती. विविध मान्यवरांनी व ग्रामस्थाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत विविध पारितोषिके देण्यात आली. या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांसह पालक व ग्रामस्थांनी मनमुराद आनंद लुटला.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका सुरेखा खाडे, सुत्रसंचालन शिक्षिका सुमन पालवे, सविता कुटे, सुनयना शहाणे यांनी केले. तर सविता आंधळे यांनी आभार मानले.

# पारनेर तालुका राजकीय कुस्त्या लावण्यासाठी माहीर

### डॉ. सुजय विखे । बाबासाहेब तांबे सोशल फाउंडेशनच्या आखाड्याचा जिल्ह्यात नावलौकिक

**● पारनेर । वीरभूमी–**
अंबिका माता यात्रा उत्सवा निमित्ताने माजी सभापती बाबासाहेब तांबे सोशल फाउंडेशन यांच्या वतीने मॉडेल व्हिलेज गोरेगाव येथे भव्य दिव्य अशा कुस्तीचा जंगी आखाडा मैदान काल पार पडले. पै. कोंडीबाभाऊ तांबे यांच्या हस्ते आणि सबाजीराव देठे, शिवाजीराव शेरकर यांच्या उपस्थितीत मैदान पूजन करण्यात आले. माजी सभापती बाबासाहेब तांबे यांनी सबंध आखाड्याची पार्श्वभूमी आणि रचना जाहीर केल्यानंतर आखाड्याला प्रत्यक्ष सुरुवात झाली.

या कुस्ती मैदानाला अनेक राजकीय दिग्गजांनी उपस्थिती दर्शवली होती. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी माजी सभापती बाबासाहेब तांबे सोशल फाउंडेशनच्या आखाड्याचा जिल्ह्यात नावलौकिक आहे असे गौरवोद्गार काढले. पारनेर तालुका राजकीय कुस्त्या लावण्यासाठी देखील माहीर आहे, असा टोला देखील त्यांनी लगावला.

मा.सभापती बाबासाहेब तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या आखाड्याला ते नेहमी प्रेमाने बोलावतात. आम्ही देखील नेहमी त्यांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहतो. अतिशय उत्कृष्ट नियोजन, सूत्रबद्ध चालणारा कार्यक्रम आणि शिस्त प्रामुख्याने सोशल फाउंडेशनच्या प्रत्येक कार्यक्रमात दिसते. यासाठी सर्व सदस्यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी देखील कुस्ती मैदानाचे कौतुक करताना जि. प. माजी सभापती बाबासाहेब तांबे यांचा भव्य दिव्य कार्यक्रमात हातखंडा आहे. कार्यक्रमाच्या व्यवस्थापनासाठी गोरेगाव संपूर्ण तालुक्याला नव्हे जिल्ह्याला एक आदर्श आहे असे मत व्यक्त केले. या कुस्ती मैदानासाठी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित पाटील झावरे, मुळा सहकारी साखर कारखान्याचे संचालक बापूसाहेब शेटे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुरेश गडाख पाटील, आखाड्याचे मुख्य प्रवर्तक जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाबासाहेब तांबे, एस बी शेटे, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, उद्योजक मुबारक शेख, युवा उद्योजक शुभम पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंकरराव नगरे, शिवसेना तालुकाप्रमुख विकास रोहोकले, माजी सभापती अरुणराव ठाणगे, एकनाथराव गुंड, राम गुंड, गोरक्षनाथ गुंड, माजी सरपंच डॉ. राजेश भनगडे, सरपंच अप्पासाहेब शिंदे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या मैदानात कोल्हापूर, पुणे, सातारा, नाशिक, अहिल्यानगर आणि संपूर्ण महाराष्ट्रातून जवळपास ४०० मल्लांनी सहभाग नोंदवला. यामध्ये १०० रुपये पासून शेवटची कुस्ती दोन लाख ११ हजार पर्यंत जोडण्यात आलेली होती. अनेक नामवंत मल्लांनी या मैदानाला उपस्थिती दर्शवली. तालुक्यातील आणि जिल्ह्यातील कुस्ती शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते.या मैदानात माऊली जमदाडे, सोनू कुमार (हरियाणा), चेतन रेपाळे, अनिकेत मांगडे, अक्षय कावरे, प्रणित भोसले, सागर देवकाते, अक्षय पवार, विजय पवार, मनोज फुले, अनिल लोणारे, तुषार अरुण, राम वने, भरत होळकर, शाम गव्हाणे, कुमार देशमाने, अरबाज शेख, रोहित आजबे, हृतिक माने निलेश उचाळे, तेजस उलागड्डी, सौरव मराठे , प्रकाश कार्ले, लौकिक चौगुले, आकाश चव्हाण, देवा खोसे यांसारख्या अनेक नामवंत मल्लांनी चितपट कुस्त्या केल्या. एकेरी पट, दुहेरी पट, ढाक, धोबी, निकाल, कलाजांग, साल्टो बॅक थ्रो अशा अनेक डावांची उधळण या जंगी मैदानाला झाली.



शेवटची कुस्ती माऊली जमदाडे आणि सोनू कुमार हरियाणा यांच्यात झाली. यांच्यात माऊली जमदाडे खालच्या बाजूने अंगावर लोट मारत चिटपत कुस्ती केली. दुपारी तीन वाजता सुरू झालेला कुस्त्यांचा थरार रात्री साडेनऊ वाजेपर्यंत सुरू होता. लखख प्रकाशात आणि फटाक्यांच्या आतिषबाजीत, हलगीच्या खनखनाटामध्ये कुस्ती शौकीन न्हाऊन निघाले. डोळ्यांचे पारणे फेडणारे मैदान झाले.

यावेळी मा सरपंच राजाराम नरसाळे, आभुषण ज्वेलर्स प्रविण नरसाळे, साहेबराव नरसाळे, प्रितेश पानमंद, गणेश तांबे, अतुल काकडे, सचिन नरसाळे, अनिल नरसाळे, तुषार नरसाळे, सुरेश चौरे, नागेश नरसाळे, राहुल तांबे आनंदा नांगरे, सागर नरसाळे, ऋषिकेश नरसाळे, संकेत तांबे, ओंकार तांबे, संतोष नरसाळे आदी कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वीसाठी प्रयत्न केले.

या स्पर्धेसाठी पंच म्हणुन गणेश जाधव, पै. दादाभाऊ नरसाळे, पै. अण्णा पाटील नरसाळे, पै. साहेबराव कोंडीबा तांबे, पै. साहेबराव तांबे यांनी काम पहिले. बाबासाहेब चौरे, भाऊसाहेब तांबे, संतोष बबन नरसाळे, संपत नरसाळे, रोशन नरसाळे, विजय तांबेयांनी कुस्ती इनाम वाटण्याचे काम केले. कुस्ती निवेदक म्हणून अक्षय मुळूक यांनी काम पहिले. आखाड्यामध्ये हलगी वाजवण्यासाठी खास कोल्हापूर येथील सुप्रसिद्ध रणजीत आवळे यांना आमंत्रित करण्यात आले होते.

# SPOT NEWS

## युवक-युवतींच्या करिअरला टेक-ऑफ देणारी ड्रोन कार्यशाळा शहरात उत्साहात

**● नगर । वीरभूमी-**

अहिल्यानगर शहरात अहमदनगर एज्युकेशन सोसायटी व सेरेब्रोस्पार्क इनोव्हेशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रोन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलच्या सभागृहात आयोजित या एकदिवसीय कार्यशाळेला युवक, युवती, शिक्षक, पालक व शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यशाळेचे उद्घाटन सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सल्लागार सदस्य भूषण भंडारी, राजेश कुलकर्णी, ड्रोन मार्गदर्शक गणेश थोरात, मिहीर केदार, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, रुपीबाई बोरा हायस्कूलचे मुख्याध्यापक अजय बारगळ, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य संदीप उबाळे, सेनापती बापट विद्यालय (पारनेर) मुख्याध्यापक संतोष कुलकर्णी, भिंगार हायस्कूलचे मुख्याध्यापक रावसाहेब कासार, साईनाथ विद्यालय (शिर्डी) मुख्याध्यापक अभिमन्यू डुबल आदींसह युवक-विद्यार्थी व पालक वर्ग आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेत उपस्थितांना ड्रोनच्या मूलभूत रचनेपासून ते त्याचे उड्डाण कसे करावे याचे सखोल प्रशिक्षण व्याख्यान व प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात आले. विविध प्रकारच्या ड्रोनची माहिती देताना, त्यांच्या कृषी, औद्योगिक, आपत्कालीन सेवा, फिल्मनिर्मिती, सुरक्षा आणि नकाशे बनवणे अशा विविध उपयोगांवर प्रकाश टाकण्यात आला. फोन ड्रोन कॅमेरा, त्यातील व्हिडिओ क्षमता, लाईव्ह ट्रान्समिशन, अडथळे ओळखण्याचे तंत्रज्ञान याविषयीही तपशीलवार माहिती दिली गेली.

## निमगाव वाघात मंगळवारी श्री बिरोबा महाराज यात्रोत्सवाचे आयोजन

**● नगर । वीरभूमी-**

निमगाव वाघा (ता. नगर) येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (दि.२२ एप्रिल) गावात यात्रा उत्सव व बुधवारी (दि.२३ एप्रिल) कुस्त्यांचा हगामा रंगणार असून, संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल-उरुस होणार आहे. तर यावर्षीचे विशेष आकर्षण गुरुवारी (दि.२४ एप्रिल) बैलगाडा शर्यत होणार असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली. नुकतेच गावातील युवकांनी गंगाजल आणण्यासाठी शुक्रवारी (दि.१८ एप्रिल) रात्री पारंपारिक वाद्यांसह मिरवणूकीने कावड घेऊन प्रवरा संगमकडे प्रस्थान केले. गावातील युवकांचा जथ्था कावडी घेवून मंगळवारी यात्रेच्या दिवशी सकाळी ८ वा. गावात परतणार असून, मोठ्या उत्साहात कावडीची गावामधून डफ, ढोल, ताशे व लेझीम पथकासह मिरवणूक काढली जाणार आहे. सकाळी १० वाजता श्रीबिरोबा महाराजांच्या मूर्तीस गंगाजलाने अभिषेक घालून विधीवत पूजा केली जाणार आहे. सालाबाद प्रमाणे होणाऱ्या यात्रोत्सवानिमित्त मोठ्या संख्येने जिल्ह्यातील भाविक दर्शनासाठी येत असतात. यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, रात्री ९ वाजता छबीना मिरवणूक काढली जाणार आहे.

# शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील मुळा चाऱ्यांची होणार दुरूस्ती

### आ. मोनिकाताई राजळे । जलव्यवस्थापन कृती पंधरवडा-२०२५ अंतर्गत मुळा पाटंधारेच्या चाऱ्यांच्या दुरुस्तीचा शुभारंभ

**● शेवगाव । वीरभूमी-**

मुळा धरणाचे सिंचनावरील शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील वितरिका, लघुवितरिका यांचे कामे होऊन सुमारे ६० वर्षांचा कालावधी झाला आहे. यामुळे नादुरूस्त अवस्थेत असलेल्या वितरिका, लघुवितरिका यांची दुरूस्ती आवश्यक असल्याने जलव्यवस्थापन कृती पंधरवडा -२०२५ अंतर्गत समृध्दी फौंडेशनचे सहकार्याने शेवगाव, पाथर्डी तालुक्यातील सुमारे ४० किमी चाऱ्यांची दुरूस्ती कामांचा शुभारंभ झाला आहे. येत्या काही दिवसांत शेवगाव, पाथर्डी, राहुरी, नेवासा तालुक्यातील वितरिका/लघुवितरिका यांच्या १०० कोटी रूपये खर्चाच्या दुरूस्ती कामाचा कामांचा शुभारंभ जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे हस्ते होणार असल्याचे आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले.



जलव्यवस्थापन कृती पंधरवडा -२०२५ अंतर्गत मुळा पाटंधारे विभाग, अहिल्यानगर व समृध्दी फांडेशन अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यामाने मुळा उजवा कालवा, पाथर्डी शाखा कालवा, अंतिम वितरिकेवरील मायनर २,३, व ४ ची साफसफाई व दुरूस्ती कामाचा शुभारंभ आमदार मोनिका राजळे यांचे हस्ते झाला.

यावेळी मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील, समृद्धी फाउंडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर रसाळ, उपअभियंता स्वप्नील देशमुख, बापुनाना पाटेकर, सुलतानपूरच्या सरपंच डॉ. सविताताई फलके, अमरापुरच्या सरपंच आशाताई गरड, वरूरचे सरपंच सचिन म्हस्के, पंडीत डोईफोडे, श्रीकांत मिसाळ, डॉ. विजय फलके, कचरू चोथे, मिनाताई कळकुंबे, अनंता उकिरडे, सचिन कोळगे, बाळकृष्ण कंठाळी, अनंता उकिर्डे, बाळासाहेब फलके, धनंजय फलके, बाळासाहेब ताठे, बबनराव मरकड, उत्तमराव लंगोटे, सदाशिव कळमकर, शिवाजी पोटफोडे, काकासाहेब पोटफोडे, रमेश चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

उजवा कालवा, पाथर्डी शाखा कालवा, अंतिम वितरिकेवरील मायनर २, ३ व ४ ची साफसफाई व दुरूस्ती कामाचा फायदा आमरापुर, शहाजापूर, सुलतानपुर खु., भगूर, वरूर व सुसरे या गावातील शेतकऱ्यांना होणार आहे. कालव्यातील गाळ व अडथळे दूर करून शेतकऱ्यांना प्रवाही सिंचनाने पाणी मिळण्यात याचा उपयोग होईल. येत्या १५ दिवसांत ही कामे मार्गी लागून पुढच्या पंधरवाड्यात सुटणाऱ्या रोटेशमधुन या गावांना पाणी देण्याचे नियोजन असल्याचे आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे संकल्पनेतुन नदी जोड प्रकल्प महाराष्ट्रात राबविला जाणार आहे, यातून समुद्राला जाणारे पाणी अडवून ते अवर्षणग्रस्त शेतकऱ्यांना देण्याची योजना आहे, करिता त्यामध्ये शेवगांव-पाथर्डी तालुक्यासाठी पाणी आरक्षित करणेकरिता मागणी केलेली असुन करिता पाठपुरावा चालु आहे. मतदारसंघातील जास्तीत जास्त गावे सिंचनाखाली येण्यासाठी माझा पाठपुरावा असल्याचे आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले.

## संगमनेर रोटरी क्लबच्या पाणपोईचे उद्घाटन




**● संगमनेर । वीरभूमी-**

संगमनेर रोटरी क्लब तर्फे रोटरी पाणपोई चे उद्घाटन रोटरी क्लब अध्यक्ष रो. साईनाथ साबळे यांच्या हस्ते रो. पवन वर्मा यांचे घरा जवळ, अरगडे गल्ली, नाशिक हायवे, संगमनेर या ठिकाणी करण्यात आले. हे या पाणपोईचे १४ वे वर्ष आहे.

उन्हाळ्यात अतिशय तहान लागत असते आणि या रस्त्याने जाणारे येणाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात आहे. येथे साधारणता १५०० लोक दररोज या ठिकाणी पाणी पिण्याचा आनंद घेत असतात. या प्रोजेक्टचे चेअरमन रो.पवन कुमार वर्मा हे क्लब च्या वतीने सर्व व्यवस्था पाहत असतात. या प्रोजेक्टचे उद्घाटन प्रसंगी रोटरी क्लब संगमनेर चे अध्यक्ष रो. साईनाथ साबळे, सेक्रेटरी रो.विश्वनाथ मालानी, प्रोजेक्ट चेअरमन रो. पवनकुमार वर्मा, माजी अध्यक्ष रो. आनंद हासे, रोटरी डायरेक्टर रो. अजित काकडे, उपाध्यक्ष रो. महेश वाकचौरे, रो. मधुसूदन करवा या वेळी उपस्थित होते.

## पाथर्डी शहरात चँम्पीयन तायकांदो ॲकडमीचा शुभारंभ

**● पाथर्डी । वीरभूमी-**

पाथर्डी शहरातील चँम्पीयन तायकांदो अँकडमीतील विद्यार्थी राज्याच्या पातळीवर यशस्वी घोडदौंड करतील. प्रत्येक क्षेत्रात उत्तम कामगिरी करुन राज्यभर नावलौकीक मिळवणारे पाथर्डीतील अनेक दिग्गज आहेत. महेश भागवत, राकेश अकोलकर, भारत मरकड, तेजस्वीनी सातपुते, अविनाश ढाकणे यांच्या सारखे अधिकारी प्रशासनात पाथर्डीचा ठसा उमठवत आहेत. उद्याच्या काळात तायकांदो क्षेत्रात राज्यपातळीवर यश मिळविण्याचे काम चँम्पीयन तायकांदो अँकडमीच्या संचालिका पायल असलकर यांनी करावे असे आवाहन पाथर्डी तालुका तायकांदो संघटनेचे सचिव अंबादास साठे यांनी केले. शहरातील चँम्पीयन तायकांदो अँकडमीचा शुभारंभाच्या कार्यक्रमात साठे बोलत होते.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र सावंत होते. ज्योती उदबत्ते, भारती असलकर, योगेश शिंदे, सागर सानप, सुप्रिया मंत्री, पायल असलकर, मिना पारशे, अनिता काटकर, स्नेहल पारखे उपस्थीत होते.

महीला व मुलीमधे तायकांदो बाबत जागृती होणे गरजेचे आहे. महीला समाजात वावरताना त्यांची भिती गेली पाहीजे. महीलांच्या आर्थिक स्वावलंबना बरोबर त्या आत्मनिर्भर झाल्या पाहीजेत. प्रत्येक क्षेत्रात महीलांचे योगदान वाढते आहे.

तायकांदोमधे महीलांनी राज्य पातळीवर यश मिळविण्यासाठी चांगेल मार्गदर्शन करुन पाथर्डीचे नाव उज्वल करणार असल्याचे तायकांदो प्रशिक्षक पायल असलकर यांनी सांगितले. भारती असलकर यांनी स्वागर करुन सुत्रसंचालन केले. ज्योती उदबत्ते यांनी आभार मानले.

# भालेराव बंधूंनी सामाजिक कार्याचे क्षेत्र वाढवावे

### सहा. संचालक विनोद लोंढे । आई-वडिलांच्या स्मरणार्थ दिले जलशुद्धीकरण यंत्र

**● पारनेर । वीरभूमी-**

पारनेर तालुक्यातील ढवळपुरी गावातील खारवाडी येथील ग्रामीण भागातील चंद्रकांत भालेराव, शशिकांत भालेराव, राजेंद्र भालेराव व रोहिदास भालेराव यांनी आपल्या कष्टाच्या व मेहनतीच्या जोरावर ते राष्ट्रीय पातळीवर कार्य करीत असून त्याच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात शैक्षणिक, सामाजिक कार्यात चांगले काम करीत असून त्यांनी त्यांचे कार्यक्षेत्र वाढवून इतरांनाही त्याचा लाभ द्यावा असे प्रतिपादन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक विनोद लोंढे यांनी केले.



पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील आश्रमशाळेत भालेराव बंधूंनी आपल्या आईवडिलांच्या स्मरणार्थ भेट दिलेल्या जलशुद्धीकरण यंत्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पारनेरचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर, संस्थेचे सचिव रेहान काझी, सरपंच भागाजी गावडे, सुखदेव चितळकर, सुरेश रोहकले, बाबाजी चौधरी, ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र व्यवहारे, राजू पथवे, संभाजी ढेकळे, कविवर्य रामदास भालेराव, जितेंद्र शिंदे, कादरभाई शेख, भाऊसाहेब भुसारी, प्राचार्य बापूसाहेब रुपनर, मुख्याध्यापक संदीप महांडुळे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना विनोद लोंढे म्हणाले की, आश्रमशाळा ढवळपुरी ही जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील एक नावाजलेली आश्रमशाळा आहे. येथील अनेक विद्यार्थी गुणवत्तेच्या जोरावर विविध ठिकाणी उच्च पदावर कार्य करीत आहेत. येथील विद्यार्थ्यांसाठी जलशुद्धीकरण यंत्र भेट देऊन भालेराव बंधूंनी मोठे सामाजिक व पुण्याचे कार्य केले आहे. सायबर सिक्युरिटी मध्ये काम करीत असताना त्यांचे गावाकडे लक्ष आहे ही महत्त्वाची गोष्ट आहे.

पोनि. समीर बारवकर म्हणाले, ढवळपुरी हे विस्तीर्ण व दुर्गम भागात येते. परंतु येथील लोकांच्या कार्यामुळे ढवळपुरीचे नाव राज्यस्तरावर व राष्ट्रीयस्तरावर गाजत आहे. मोबाईलचा वापर करताना तरुणाईने सावधगिरी बाळगली पाहिजे. त्यातले त्यात मुलींनी इंस्टाग्राम, फेसबुक, व्हाट्सअप सारख्या सायबर क्राईम होणाऱ्या गोष्टींकडून सावध राहावे.

सरपंच भागाजी गावडे म्हणाले, ढवळपुरी सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थी दर्जेदार शिक्षण घेऊन प्रगती करित असून उच्च पदावर कार्यरत आहेत. तसेच भालेराव बंधूंच्या सामाजिक कार्याचा गावाला फायदा होत आहे.

राजेंद्र भालेराव म्हणाले, आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ जल शुद्धीकरण यंत्राचे लोकार्पण करताना खूप आनंद होत आहे. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतूनच आम्ही सामाजिक कार्य करीत आहोत. त्यासाठी आश्रमशाळा व परिसरातील नागरिकांचे खूप सहकार्य मिळते.

संस्थेचे सचिव रेहान काझी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन शिक्षक लतिफ राजे यांनी केले तर प्राचार्य बापूसाहेब रुपनर यांनी आभार मानले. याप्रसंगी विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भालेराव बंधूंनी शुद्ध पाण्याचे महत्त्व ओळखून जवळपास ३ लाख रूपये किंमतीचे यंत्र आश्रमशाळेला भेट दिले. सदर जलशुद्धीकरण यंत्रामध्ये दर तासाला ५०० लिटर पाणी शुद्ध होणार आहे.

### राजेंद्र भालेराव यांची निवड

■ राजेंद्र भालेराव हे राष्ट्रीय पातळीवर सायबर सिक्युरिटी मध्ये काम करीत आहेत. त्यांनी आता पर्यंत अनेक कंपन्यांबरोबर या क्षेत्रात उत्कृष्ट असे काम केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची राष्ट्रीय सायबर सुरक्षा मानक अंतर्गत तांत्रिक सल्लागार मंडळावर सन्माननीय सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. राजेंद्र भालेराव, शशिकांत भालेराव व चंद्रकांत भालेराव यांनी मागील चार पाच वर्षांपासून भाळवणी, ढवळपुरी परिसरात शैक्षणिक, सामाजिक व आरोग्य क्षेत्रात गरजवंतांना मदत करून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो हे दाखवून दिले आहे.

## शिवदुर्गने केली धर्मवीरगडावरील हत्तीमोट बारवेची स्वच्छता



**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

महाराष्ट्र बारव मोहिम अंतर्गत शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन व शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीच्या वतीने पांडे पेडगावचा किल्ले धर्मवीरगड येथील पुरातन हत्तीमोट बारवची स्वच्छता करून यावर्षीचा बारव संवर्धन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

महाराष्ट्रातील गडकिल्ले आणि बारव संवर्धन कार्य करणाऱ्या शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व वारसा संवर्धन समितीचे उपाध्यक्ष दिगंबर भुजबळ यांच्या नियोजनात ही मोहिम पार पडली. श्रीगोंदा तालुक्यात एकूण ११५ बारवा आहेत. मागिल चार वर्षांपासून शिवदुर्ग परिवार बारव स्वच्छता अभियान राबवत आहे. आपल्या पूर्वजांचा वारसा जतन करत आहे.

मागील काही दिवसांपासून धर्मवीरगडावर पर्यटकांचा ओढा वाढला आहे. भीमा नदीच्या तीरावर असलेली ही पुरतान हत्तीमोट बारवेला काटेरी झुडपे व गवत यांचा विळखा पडलेला होता. संपुर्ण बारव नजरेस पडत नव्हती. संपुर्ण महाराष्ट्रातून असंख्य पर्यटक, अभ्यासक धर्मवीरगडाला भेट देतात. पण सुकलेले लांब गवत व काटेरी झुडपामुळे संपुर्ण हत्तीमोट बारवचे दर्शन होत नव्हते. अभ्यासता येत नव्हती. म्हणूनच शिवदुर्ग परीवाराच्या सदस्यांनी ही बारव स्वच्छता मोहीम राबवली. काटेरी झुडपे तोडून बारवेच्या आतील भागातील परिसर स्वच्छ केला. गवत काढून पायउतार रस्ता मोकळा केला.

या मोहिमेत उपाध्यक्ष सचिन भोसले, अमोल बडे, प्रा. भरत खोमणे, प्रणव गलांडे, तुषार चौधरी, ॲड. गोरख कडूस, अक्षय ओहळ, सागर शिंदे, दिगंबर भुजबळ, स्मिता तरटे, शंभुराजे कडुस, शिव कडूस, कुणाल खोमणे, आदित्य खोमणे यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# शेतकऱ्यांना बंदिस्त पाइपलाइनने पाणी देण्याचा विचार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । निळवंडे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी संगमनेर येथे बैठक

**● संगमनेर । वीरभूमी–**

निळवंडे धरणाचे काम पूर्ण होण्यासाठी अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे योगदान असून, लाभक्षेत्रातील शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचवण्यासाठी बंदिस्त पाइपलाइनद्वारे पाणी पुरवण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे, अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. निळवंडे कालव्यांच्या अस्तरीकरणासंदर्भात शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन एकत्रित अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.

अकोले तालुक्यातील निळवंडे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी संगमनेर येथे पालकमंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी आमदार डॉ. किरण लहामटे, अमोल खताळ, माजी आमदार वैभव पिचड, तहसीलदार धीरज मांजरे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप हापसे, कैलास ठाकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या कालव्यांच्या अस्तरीकरणासंदर्भातील, पाणीपुरवठ्याच्या तसेच रस्त्यांच्या प्रश्नांबाबत शेतकऱ्यांच्या भूमिकेला जलसंपदा विभाग प्राधान्य देईल. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मताचा विचार करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे पालकमंत्री विखे पाटील म्हणाले.

निळवंडे लाभक्षेत्रातील रस्त्यांचे आता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात येईल. धरणाचे लाभक्षेत्र मोठे असल्याने शेवटच्या शेतकऱ्यालाही पाणी मिळावे, यासाठी मध्यप्रदेशातील मोहनपुरा व कुंडलिया जलाशयांप्रमाणे स्काडा प्रणालीचा वापर करून बंदिस्त पाइपलाइनद्वारे पाणीपुरवठ्याचा विचार करण्यात येत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पाण्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या तसेच धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. निळवंडे प्रकल्पासाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर दाखल गुन्हे मागे घेण्यासाठी मंत्रिमंडळासमोर अहवाल सादर करून निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाहीही



त्यांनी यावेळी दिली.

निळवंडे जलाशयाला स्व. मधुकरराव पिचड यांचे नाव देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे व माजी आमदार वैभव पिचड यांनीही आपली मते मांडली.

# निळवंडे धरणास जलनायक मधुकररावजी पिचड साहेब नाव द्यावे : यशवंतराव आभाळे यांची मागणी

**● अकोले । वीरभूमी–**



अकोले तालुक्यासह उत्तर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या निळवंडे धरणाच्या निर्मिती मध्ये माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे सर्वात मोठे योगदान असून त्यांनी या धरणासाठी आपली सर्व राजकीय कारकिर्द या साठी खर्च करून अकोलेसह अनेक तालुक्यांचा पाणी प्रश्न सोडविलेला आहे.त्यामुळे या निळवंडे धरणास जलनायक मधुकररावजी पिचड साहेब यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी निळवंडे धरणग्रस्त कृती समितीचे सचिव तथा भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष यशवंतराव आभाळे यांनी केली आहे.

आज भाजप पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजप तालुका सरचिटणीस राहूल देशमुख, उपाध्यक्ष सोमनाथ पवार, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी सुधाकर देशमुख, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, तालुका सरचिटणीस मच्छीन्द्र मंडलिक, राजेंद्र डावरे, खंडू बाबा वाकचौरे, अशोकराव आवारी, प्रतीक वाकचौरे, विवेक चौधरी, दगडू हासे, बाळासाहेब सावंत, रमेश राक्षे, रोहिदास वाल्हेकर, महेश काळे, आदीसह अनेक प्रकल्पग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

यावेळी यशवंतराव आभाळे पुढे म्हणाले की, अकोले तालुक्यासह उत्तर नगर जिल्ह्याला वरदान ठरलेले निळवंडे धरण हे अकोले तालुक्यातील एक महत्वपूर्ण धरण आहे. या निळवंडे धरणाच्या निर्मितीला ५० पेक्षा जास्त वर्षाचा इतिहास आहे. या निळवंडे धरणाची जागा निश्चित करण्यापासून निळवंडे धरण निर्मिती होइपर्यंत अनेक अडथळे, अडचणी निर्माण होऊन सुद्धा हे धरण एक राज्याला नव्हेतर देशाला दिशा देणारे आदर्श धरण म्हणून ओळखले जाते.आणि दुसरी बाजू म्हणजे आधी पुनर्वसन मग धरण असे धोरण घेऊन निर्मिती झालेले हे धरण आदर्श पुनर्वसन झालेले धरण होय. आशिया खंडात एकाच धरणाला चार कालवे असलेले हे एकमेव धरण असून या धरणाला पिचड पॅटर्न म्हणून ओळखले जाते .कारण या धरणाच्या निर्मितीमध्ये सर्वात मोठे योगदान, पाठपुरावा करण्यात माजी मंत्री मधूकररावजी पिचड साहेब यांचा सिंहाचा वाटा आहे.

या धरणामुळे अकोले सह संगमनेर/ राहाता तालुक्यातील अनेक वर्षे तहानलेली गावे पाण्याखाली आली असून ही गावे आता बागायती होतांना दिसत आहे.आज या निळवंडे धरणावर वीज निर्मिती प्रकल्प चालू आहे. धरणग्रस्तांचें योग्य पुनर्वसन करण्यात आलेले आहे. धरणग्रस्तांच्या/ प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना शासकीय, निमशासकीय, सहकारी क्षेत्रात नोकऱ्या मिळवून दिलेल्या आहेत. धरणाच्या वरील बाजूस उंचावर असलेल्या शेतकऱ्यांना शेतीला पाणी मिळावे म्हणून उच्च स्तरीय कालवे काढून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडला आहे. धरण कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांना पाणी मिळाल्याने जिरायती क्षेत्र ओलिताखाली येवुन बागायती होवू पहात आहे. या धरण निर्मिती मुळे अनेक गावे पुलांच्या साखळी मुळे जोडली गेली आहे. पर्यायाने वाहतूक व्यवस्था सुरळीत, जलदगतीने झाली आहे. पिंपरकने पूल हा १५ गावांना जोडणारा असून सर्वात उंच व लांब असलेला पूल म्हणून ओळखला जातो. माजी मंत्री पिचड साहेब यांनी प्रत्येक धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी दर आठवड्याला अधिकारी व संबधीत विभागाशी मिटिंग घेऊन अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. संपूर्ण राजकीय कारकिर्द या धरणासाठी घालवून हे निळवंडे धरण निर्माण करण्यात माजी मंत्री मधुकररावजी पिचड साहेब यांचे मोलाचे योगदान आहे. या धरणाचे देशाचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी उदघाटन केले तसेच राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालक मंत्री या प्रसंगी उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झालेले आहेत. याचे सारखे भाग्य कोणत्याही मंत्री महोदयाला मिळालेले नाही ते भाग्य वंदनीय पिचड साहेब यांना मिळाले आहे.

निळवंडे धरणाचे खरे शिल्पकार वंदनीय पिचड साहेब असल्याने या धरणाला वंदनीय मधुकररावजी पिचड साहेब यांचे नाव देण्यात यावे अशी तालुक्यातील नव्हेतर संपुर्ण जिल्ह्यातील लाभधारक शेतकरी यांची इच्छा आहे.

तरी या निळवंडे धरणास पिचड साहेब यांचे नाव देण्यात अशी मागणी सर्व धरणग्रस्त आणि लाभार्थी यांच्या वतीने निळवंडे धरणग्रस्त कृती समिती व अकोले तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने यशवंतराव आभाळे यांनी यावेळी केली.व त्या आशयाचे विनंती पत्र मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा.यांना वपाठविले असल्याची माहिती त्यांनी दिली.

# गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक तयार करा

## आ. आशुतोष काळे यांच्या पोलिस प्रशासनाला सुचना

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव शहरातील सचिन वॉच कंपनी या घड्याळाच्या दुकानात शुक्रवार (दि.१८) रोजी मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी दुकानाचे शटर उचकटून रोख रक्कमेसह लाखोंच्या घड्याळाची चोरी केली होती. घटनेची माहिती समजताच त्या चोरीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर आ. आशुतोष काळे यांनी पोलीस अधीक्षक राकेश ओला व स्थानिक पोलीस प्रशासन यांच्याशी चर्चा करून तपासाबाबत सूचना केल्या होत्या. रविवार (दि.२०) रोजी चोरीची घटना घडलेल्या सचिन वॉच कंपनी या दुकानात जावून दुकान मालक लोहाडे बंधू यांच्याकडून घटनेची माहिती जाणून घेतली. यावेळी उपस्थित अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलूबुर्मे, पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांना तपासाला गती देवून गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक तयार करा व लवकरात लवकर चोरीच्या घटनेतील गुन्हेगारांना जेरबंद करा अशा सूचना केल्या.



यावेळी आ.आशुतोष काळे म्हणाले की, मोठ्या शहरात होणाऱ्या धाडसी चोऱ्यांच्या घटनेप्रमाणे कोपरगावात शहरात देखील शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी चोरीच्या घटना घडू लागल्या ही चिंतेची बाब आहे. पोलीस प्रशासनाचे अपयश असून त्यामुळे पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक राहीला नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कोपरगाव शहरात पोलीस प्रशासनाचा धाक निर्माण करून कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवत गुन्हेगारांमध्ये वचक रहील अशा पद्धतीने कोपरगाव शहरासह तालुक्यात परिस्थिती निर्माण करा. कोपरगाव शहरातील गुन्हेगारांची पाळमूळ शोधून काढून भविष्यात कोपरगाव शहरासह तालुक्यात अशा घडणार नाहीत याची काळजी घ्या. नागरीकांना नेहमीच सुरक्षित वाटेल असे तालुक्याचे वातावरण निर्माण करा. अवैध धंद्याला लगाम लावून पोलीस गस्त वाढवा व अवैध व्यवसाय करणारा कोणत्याही राजकीय पक्षाचा कार्यकर्ता असो त्याची गय न करता कडक कारवाई करा अशा शब्दात आ.आशुतोष काळे यांनी पोलीस प्रशासनाला सूचना केल्या.

यावेळी अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलूबुर्मे, पोलीस निरीक्षक भगवान मथुरे, पोलीस निरीक्षक संदीप कोळी, गोदावरी दुध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे, महात्मा गांधी जिल्हा गांधी चरीटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, व्यापारी महासंघाचे सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते व व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिवरे बाजार येथील डोंगरात वनवा

## ग्रामस्थांचे पाच तासांच्या अथक प्रयत्नातून आगीवर नियंत्रण



**● भाळवणी । वीरभूमी–**

आदर्शगाव हिवरेबाजार येथील डोंगराला दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता आग लागली. पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरे बाजारमध्ये ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यन्वित असल्याने तरुण व ग्रामस्थ घटनास्थळी हजर झाले. ग्रामस्थ व तरुण मंडळ तसेच ग्रामवन समितीचे सदस्य यांच्या अथक प्रयत्नातून तब्बल ५ तासांच्या प्रयत्नानंतर आग नियंत्रणात आली.

गेल्या महिनाभरात हिवरे बाजारच्या डोंगराला वणवा लागण्याची ही तिसरी वेळ असून शेजारील गावातील शेतकऱ्यांनी शेताचा बांध पेटवून दिल्यामुळे डोंगराला आग लागली. सन २०१८ पासून आतापर्यंत जवळपास २३ वेळा हिवरे बाजारचे ग्रामस्थांनी डोंगराची आग विझवली आहे.

# गर्भगिरी डोंगरातील पाणवठ्यात टँकरने पाणी

## जय हिंद फाउंडेशनचा पशु-पक्षी व प्राण्यांना दिलासा!

**● नगर । वीरभूमी–**

उन्हाळ्यात तापमान झपाट्याने वाढत असताना, गर्भगिरी डोंगर परिसरातील पशु-पक्ष्यांच्या पाण्याच्या टंचाईपासून वाचविण्यासाठी जय हिंद फाउंडेशनच्या वतीने वन विभागाच्या पानवठ्यात टँकरद्वारे पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून, ही कृती जंगलातील प्राणीजीवनासाठी जीवनदायिनी ठरणार आहे.

वृक्षारोपणासह निसर्ग संवर्धनासाठी झटणाऱ्या जय हिंद फाउंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम दरवर्षी राबविला जातो. यावर्षी आगडगाव रस्त्यावरील कोल्हार घाट परिसरात, डोंगर व जंगल भागातील ठिकाणी ही पाण्याची सोय करण्यात आली.

या उपक्रमाचा शुभारंभ बोईसर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे, अनिल गर्जे, रोहिदास पालवे, ऋषिकेश पालवे, वैभव पालवे, प्रसाद पालवे, मेजर सचिन पालवे, माजी उपसरपंच कारभारी गर्जे, आदेश पालवे, अनिल ससे यांच्यासह आजी-माजी सैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते.



मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे म्हणाले की, जय हिंद फाउंडेशनचे कार्य हे निसर्ग संवर्धनाच्या दिशेने प्रेरणादायी आहे. त्यांचे वृक्षारोपण व संवर्धनाचे कार्य समाजासाठी मार्गदर्शक ठरत आहेत. उन्हाळ्यात जंगलातील पशु-पक्ष्यांना पाण्याची टंचाई भासत असते. त्यामुळे हे पाणवठे त्यांच्या जगण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. जंगलातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासही अशा उपक्रमांचा मोठा फायदा होतो.

शिवाजी पालवे म्हणाले की, निसर्ग रक्षण ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येकाची जबाबदारी आहे. जय हिंद फाउंडेशनच्या या उपक्रमातून समाजात पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होऊन भावी पिढीला निसर्गसंपन्न जीवनशैलीची प्रेरणा मिळेल. पशु-पक्ष्यांना पाण्याअभावी मृत्यू ओढवू नये, यासाठी आम्ही दरवर्षी हे अभियान राबवतो. प्रत्येकाने आपल्या घरी, अंगणात किंवा टेरेसवर पक्ष्यांसाठी पाणी आणि धान्य ठेवावे. यामार्फत आपणही या निसर्ग चळवळीचा भाग होऊ शकतो. गरज पडल्यास अधिक टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. मेजर सचिन पालवे यांनी सर्वांचे आभार मानले.